# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ 860 /२०२३ दि. 11 /०९/२०२३

## निविदा सूचना

प्रति,

.........................................

.........................................

.........................................

विषय :- सन २०२३-२४ करिता मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत भांडार विभाग येथील विविध कामे कंत्राट पद्धतीने मजुरांकडून करून घेण्याबाबत निविदेमार्फत दर कळविणे बाबत......

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत भांडार विभागातील कामे कंत्राटी पद्धतीने मजुरांकडून करण्याकरिता इच्छुक कंत्राट दाराकडून प्रति हेक्टर दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदेचे स्वरूप/निविदा मसुदा सोबत जोडण्यात आलेला आहे.

अटी व शर्ती

१. निविदा/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी. तसेच लिफाफ्यावर "भांडार विभागातील विविध कामा करिता दराचे निविदापत्रक " असे नमूद करावे.
३. निविदा/कोटेशन मध्ये कंत्राटदाराचे संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबर ई. स्पष्टपणे नमूद करावे.
४. निविदाधारक/कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
५. भांडार विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत भांडार विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी सांगितलेले कामे पूर्णपणे व वेळेत करणे गरजेचे राहील.

७. भांडार विभाग येथील कामे करीत असतांना दुर्घटना/अपघात किंवा जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटधारकाची राहील.

८. भांडार विभागातील कामे कामे करीत असतांना विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटधारका कडून वसूल करण्यात येईल.

९. विभागांचे प्रक्षेत्रावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१०.भांडार विभागावर नेमून दिलेले कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

११.कामाचे देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयकाचा विचार केला जाणार नाही.

१२.विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राट धारकांना बंधनकारक राहील.

१३.सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे ५०० रु. चे स्टंप पेपर वर करारनामा आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१४.वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. २०.०९. २०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

# निविदा मसुदा

प्रति,

..........................................

..........................................

......................................

विषय :- मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत भांडार विभाग येथील कामे कंत्राटी पद्धतीने मजुरांकडून करण्याबाबत चे दर कळविणे बाबत......

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला सन २०२३-२४ करिता भांडार विभाग येथील विविध कंत्राट पद्धतीने करण्याकरिता मला सर्व अटी व शर्ती मान्य असून दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | प्रती पुरुष मजूर प्रति ८ तास | प्रती स्त्री मजूर प्रति ८ तास |
|---|---|---|---|
| १. | १. बियाणे प्रक्रिया केंद्रामध्ये विवध विभागावरील कच्चे बियाणे आणणे व प्रक्रिया करून चांगले बियाणे गोडाऊन मध्ये पोत्यांची थप्पी मारणे.<br>२. विविध विभागावरून आलेले कच्चे बियाणे वजन काटा करून पोत्यांची थप्पी मारणे.<br>३. प्रक्रिया केलेले चांगले बियाणे ब्यागिंग , टयागिंग करणे.<br>४. व्यापारी प्रतीचा माल बाजार समितीमध्ये विक्रीकरिता नेण्याकरीता गाडीमध्ये पोते भरून देणे तसेच उतरवून देणे.<br>५. विविध विभागावर लागणारे खते, औषधे पोहोचविणे.<br>६. भांडार विभागावर प्रभारी अधिकारी यांनी नेमून दिलेले कामे तसेच वेळेवर येणारे इतर कामे करणे. | | |
| २. | विविध विभागावरून आलेले बियाणे साफ करणे, भुईमुगाच्या शेंगा फोडणे, कापूस जिनिंग करणे, सरकी निवडणे, भांडार विभागाची साफसफाई करणे व प्रभारी अधिकारी यांनी नेमून दिलेले भांडार विभागातील इतर कामे करणे | | |

ठिकाण:

दिनांक:

स्वाक्षरी

नाव, मो.नं. व संपूर्ण पत्ता